O/C

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक २० नोव्हेंबर २०२०

प्रति,

**मा. उद्धवसाहेब ठाकरे**
**मुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य**
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई ४०० ००१.

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई, - ४०० ०३२.
दिनांक 1/12/2020

**विषय : सामान्य वीज ग्राहकावरिल कोरोना महामारि लॉक डाउन काळातील अतिरिक्त वीज देयकाचा बोजा कमी करुन देण्याबाबत निवेदन.**

महोदय,

आमचे प्रस्तुत असोसिएशन हे मुंबई पश्चिँम उपनगरातील अंधेरी येथील एक अग्रेसर सामजिक संस्था असुन सामान्य करदात्या नागरिकाच्या हिताकरिता सातत्याने कार्यरत आहे.

लॉक डाउन च्या काळात कोविड महामारित आपल्या जिवाची परवा न करता आपल्या मंत्रालयानतर्गत असणाऱ्या वीज खात्याने आपल्या कोरोना योद्ध्यांमार्फत २४ तास वीज पूरवठा सूरळीत पणे संपूर्ण महाराष्ट्रभर केला त्या बद्दल अभिनंदन! लॉक डाउन मूळे भर उन्हाळ्यात घरात बंदिस्त असलेल्या जनतेला तो एक फार मोठा आधार उपलब्ध झाला, ज्यामुळे ही सार्वत्रिक बंदी किमान सुसह्य झाली.

असे असताना वीज वापरात वाढ होणे हे साहजिकच होते परिणामी वीज देयक इतर महिन्यान्पेक्षा थोडे अधिक येणार याची मानसीक तयारी प्रत्येकाने केलीच होती.दरम्यानच्या काळात कोविड महामारि निर्बन्धान्मूळे आपले मिटर रिडर प्रत्यक्ष जागेवर न येऊ शकल्याने आपण मागील 2019 च्या डिसेंबर,नोव्हेंबर व जानेवारी या तीन महिन्याची सरासरी पडताळून प्रत्येक वीज ग्राहकास लॉक डाउन काळातील तीन महिन्यांचे देयक पाठविले परंतू या देयकांची रक्कम इतकी प्रचंड आहे की सरासरिच्या दूप्पट ते तिप्पट बिले ही ग्राहकाना देण्यात आली आणी त्यातील विक्रमी आकडे मुंबईत पाहायला मिळत आहेत .गोंधळलेल्या वीज ग्राहकाने याबद्दल आपल्या नजिकच्या वीज कंपनीच्या कार्यलयात चौकशी केले असता,लॉक डाऊन काळात एमईआरसी ने विजेचा दर वाधविल्याने देयकातील रक्कम वाढल्याचे सांगण्यात आले.

लॉक डाउन मूळे आधिच नोकरी गमावलेल्या, पगार निम्मे झाल्याने मेटाकुटिस आलेल्या सामम्न्य विज ग्राहकावर ही फार मोठी अस्मानी ठरली आहे. त्यामूळे तमाम वीज ग्राहकन्मध्ये असंतोष खदखदत आहे.

महाराष्ट्राशेजारिल इतर राज्यानी कोरोना महामारि लॉक डाउन काळातील वीज देयकात सरसकट 50 टक्के सूट दिली आहे तशीच सूट आपण सर्व वीज ग्राहकाना द्यावी अशी आग्रही मागणी आम्ही आपणाकडे करत आहोत. एमईआरसी (MERC) ने जरी वीज दरात वाढ केली असली तरी आप्वादात्मक स्तिथीत राज्य सरकारला ती नाकारण्याचे अधिकार आहेतच. कोविड महामारि ही शतकातील अपवादात्मक नैसर्गिक आपदा आहे त्यामूळे आपण आप्ल्या अधिकाराचा जनतेच्या कल्याणासाठी उपयोग आताच करण्याची वेळ आहे.

प्लॉट नं ७८ / बी - १४, व.अं.साथी स.गृ.सं.म., सरदार वल्लभभाई पटेल नगर, (म्हाडा), वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई ४०० ०५३
www.svpnrwa.in

Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

आपण जरी वीज देयकांचया पडताळणी बाबत जनतेस वीज कम्पन्याना सम्पर्क साधण्याचे आवाहन करत असलात तरी या कंपन्या तेथे चौकशीस जात असलेल्या ग्राहकास देयक कसे योग्य आहे हे सांगुन त्यास बिल भरण्यास सांगत आहेत.

**आपण डिसेंबर 2020 पर्यंत कोणाचाही वीज पूरवठा खंडीत करणार नाही असे आश्वासन देत आहात त्यावद्दल आपले आभार परंतू एकिकडे तीन आठवड्याच्या समान हफ्त्यात वीज देयकाची रक्कम एक रुपयाही कमी न करता मागत आहात**

**मूळा प्रवरा सारख्या खाजगी सहकारी वीज संस्थांचे थकीत दोन हजार कोटिचे देयक रद्द करत असताना कोणिही वीज मंडळ तोट्यात आहे अशी ओरड करत नाही परंतू साधारण वीज ग्राहकास जेव्हा सूट देण्याची वेळ येते तेव्हा मात्र वीज मंडळाची किती हजार कोटीची थकबाकी थकीत आहे वीज मंडळ कसे तोट्यात आहे अशी कारणे पूढे केली जातात जे अतिशय चुकीचे आहे.**

100 यूनिट वीज माफिही आपण थकीत वीज देयकांचया वसूल झालेल्या रकमेतून करणार आहात याला काय म्हणावे?

आम्हास वीज माफी नकोय. आम्ही वीज बिल भरण्यास तयार आहोत पण ते देयक आमच्या वापराशी निगडीत असावे एवडिच आमची माफक अपेक्षा आहे.लोककल्याणकारी राज्यात जनता ही सार्वभौम असते तिचा असा ऊपमर्द सरकार म्हणून आपण न करता सरसकट 50 टक्के सवलत कोरोना महामारि लॉक डाऊन काळातील वीज देयकात द्यावी हिच मागणी परत आपणाकडे करत आहोत.

कळावे

आपले विश्वासू

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| श्री आनंद जाधव | श्री सुर्यकांत ननावरे | श्री अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |



Scanned with CamScanner